( मराठी साप्ताहीक)

PRGI No. MHMAR / 25 / A42929

देवळी सत्यदूत वृत्तपत्र दर सोमवारला पेपर अंक प्रकाशित होत आहेत.तर सर्वांनी प्रत्येक रविवार दुपारपर्यंत माहिती अपडेट ग्रुपवर टाकावी.

**खालीलप्रमाणे :**

१) संपादकीय
२) शब्दकोड
३) वाढदिवस
४) क्राईम
५) अपघात
६) सामाजिक
७) राजकीय
८) जाहिराती
९) भ्रष्टाचार
१०) करंट वार्ता
११) शोध पत्रकारिता
१२) निधन वार्ता
१३) रोजगार
१४) बाजारभाव
१५) लेख
१६) कविता
१७) बातम्या
१८) मनोगत
१९) संभावित आकडेवारी

# देवळी सत्यदूत




E-mail : devalisatyadoot@gmail.com

मुख्य संपादक : सचिन जगनराव वैद्य, मो. : 7798775638

www.devalisatyadoot.com

वर्धा : वर्ष : १ अंक : १ सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ पृष्ठे : ४ किंमत २ रु.

# अजित पवार आणि शरद पवार यांचे दोन्ही पक्ष एकाच चिन्हावर निवडणुका लढवणार?

## फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्राचे राजकारण बदलणार?



***वृत्तसंस्था/ पुणे :***

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक दोन्ही पवार एकत्र लढले मात्र मतदारांनी दोघांनाही नाकारले आणि भाजपला स्वीकारले. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीत भाजपची सरशी ठरली आहे. यानंतर बारामतीत मोठी खलबत्त घडली आहेत. महापालिकांच्या निवडणुकातील पराभवानंतर अजित पवारांनीच थेट शरद पवारांचे निवासस्थान गाठलं. दोघांमध्ये तास-दीड तास चर्चा झाली. अजित पवार आणि शरद पवार यांचे दोन्ही पक्ष एकाच चिन्हावर निवडणुका लढण्याचा मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. यामुळे फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्राचे राजकारण बदलणार आहे.

पुणे आणि पिंपरीचिंचवडमध्ये झालेल्या मोठ्या पराभवानंतर बारामतीत पवार काका पुतण्यांमध्ये मोठी खलबतं झाल्याचं पाहायला मिळालं. महापालिकांच्या निवडणुकातील पराभवानंतर अजित पवारांनी शरद पवार यांची भेट घेतली. दोघांमध्ये तास-दीड तास चर्चा झाली. या चर्चेत पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार अमोल कोल्हे, माजी मंत्री राजेश टोपे, माझी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, यांसह आमदार रोहित पवार ही सहभागी होते. आणि अखेर या चर्चेत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका दोन्ही करत आहेत. निवडणूक एकत्र लढण्याबाबत आणि एकच चिन्ह जिल्हा परिषद साठी ठेवावं यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांशी अजित पवार यांची चर्चा सुरू.

२९ महानगरपालिकेतील निकाल पाहता आत्मचिंतन करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. १२ जिल्हा परिषदेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असून दोन्ही पवार एकत्र येणार याबाबत चर्चा सुरु असल्याची प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिलीये

दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील शरद पवारांच्या आमदारांची परस्परविरोधी भूमिका समोर आली आहे. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू

# गल्लोगल्ली एकच चर्चा, भाजप नगरसेवकाचा प्रताप!

## सार्वजनिक सुलभ शौचालयातून अनेक वर्षांपासून वीज आणि पाणी चोरीत भाजपा नगरसेवकाचे हात मलिन; फौजदारी कारवाईची प्रतीक्षा





**हाच तो भाजपा नगरसेवक बंडू उर्फ विलास जोशी**

***सचिन वैद्य/ देवळी :***
एकीकडे स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरात स्वच्छता राखण्याचे आवाहन केले जात असताना, दुसरीकडे लोकप्रतिनिधीच सार्वजनिक मालमत्तेवर डल्ला मारत असल्याचे धक्कादायक वास्तव देवळीत समोर आले आहे. देवळी नगर परिषदेचे भाजप नगरसेवक तथा माजी शिक्षण सभापती बंडू उर्फ विलास जोशी यांनी सार्वजनिक सुलभ शौचालयातील पाणी आणि विजेची गेल्या अनेक वर्षांपासून चोरी केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.

देवळी येथील प्रभाग क्र. ३ मधील काळा पूल परिसराजवळ नगर परिषदेचे सार्वजनिक सुलभ शौचालय आहे. या शौचालयाची स्वच्छता राखण्यासाठी नगर परिषदेने स्वतंत्र बोअरवेल आणि वीज जोडणीची व्यवस्था केली आहे. मात्र, नगरसेवक विलास जोशी यांनी या सार्वजनिक बोअरवेलमधून साधारण ५० मीटरची पाइपलाइन थेट आपल्या घरामध्ये टाकली होती. धक्कादायक बाब म्हणजे, या बोअरवेलचे वीज बिल नगर परिषद भरत होती, तर पाण्याचा आणि विजेचा वैयक्तिक वापर विलास उर्फ बंडू जोशी हे स्वत:च्या घरासाठी करत होते.

लोकप्रतिनिधीनेच पाणी चोरल्यामुळे सार्वजनिक सुलभ शौचालयाचा पाणीपुरवठा खंडित झाला होता. पाण्याअभावी शौचालयाची स्वच्छता होत नसल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून घाणीचे साम्राज्य माजले होते. यामुळे स्थानिक नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत होता. या चोरीबाबत नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर नगर परिषदेने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. मुख्याधिकारी नेहा आकोडे यांनी कर्मचाऱ्यांसह प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन चौकशी केली. यावेळी ५० मीटरची पाइपलाइन आणि अवैध जोडणी स्पष्टपणे दिसून आली. सरकारी मालमत्तेची चोरी आणि पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी संबंधित नगरसेवकावर कठोर कायदेशीर कारवाई करून तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी देवळीतील नागरिकांनी केली आहे. आता मुख्याधिकारी व नगर परिषद प्रशासन यावर काय पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादीने एकत्र लढण्यावर शिक्कामार्फत झालं. काही तालुक्यात दोन्ही पवार एकत्र लढणार. एकत्र लढण्याची कार्यकर्त्यांची इच्छा आहे. तर काही ठिकाणी शरद पवारांची राष्ट्रवादी स्वबळावर लढणार असं स्पष्टीकरण रोहित पवारांनी बैठकीनंतर दिले.

या बैठकीत चिन्हाबाबतही चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषद च्या निवडणुकीच्या अनुषंगाने अजित पवार राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांशी चिन्हाबाबत चर्चा झाली आहे. दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्र निवडणूक लढवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. अशातच सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची वेगळी भूमिका पाहायला मिळतेय. भाजप विरोधात सर्व पक्ष एकत्र येत निवडणूक लढवणार असल्याचं, माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी सांगितलंय. तर सोलापुरातील आमदार अभिजीत पाटील यांनी आपण भाजप विरोधात नसून, माढा आणि पंढरपूर तालुक्यातील प्रस्थापित नेत्यांविरोधात निवडणूक लढवणार असल्याचं म्हंटलंय.




## संपादकिय

# ठाकरे बंधूंचे पुनर्मिलन ठरले तोट्याचे!

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) निवडणुकांकडे यंदा देशभराचे लक्ष लागले होते. आशियातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका, त्यातील सत्तासंघर्ष आणि निवडणूक रिंगणातील रंगतदार व्यक्तिमत्वामुळे ही निवडणूक चुरशीची ठरली. निकाल समोर आल्यानंतर एक मोठी गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे, पहिल्यांदाच भाजप मुंबई महानगरपालिकेत आपला महापौर बसवणार आहे. मात्र हे कसे घडले आणि याचे राजकीय परिणाम काय असतील, यावर अपेक्षित चर्चा होताना दिसत नाही.

महाराष्ट्रभर या निवडणुकांत भाजपच्या बाजूने चित्र झुकले असले, तरी मुंबईत लढत मात्र चुरशीची होती. त्यामुळे मुंबईत भाजपने क्लीन स्वीप केला, असे म्हणता येणार नाही. खुद्द भाजपलाही तसा अंदाज नव्हता; त्यांचा उद्देश स्पष्ठ बहुमत मिळवणे, महापौरपद मिळवणे आणि स्थायी समितीवर नियंत्रण प्रस्थापित करणे एवढाच होता आणि ते उद्दिष्ट त्यांनी साध्य केले. या पार्श्वभूमीवर भाजपसाठी काय कामी आले आणि मोठ्या गाजावाजा केलेल्या ठाकरे बंधूंच्या पुनर्मिलनात नेमके काय चुकले, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. कारण मुंबई महापालिका हीच ठाकरे कुटुंबाचा शेवटचा मोठी राजकीय गड मानला जात होता.

महाविकास आघाडीने उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत चांगली कामगिरी केली होती. मात्र त्याच आघाडीला सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकांत अपयश आले. त्या वेळी मविआचे नेते अति आत्मविश्वासात होते, परस्पर समन्वय नव्हता आणि शेवटपर्यंत अंतर्गत संघर्ष सुरूच राहिला. अवघ्या वर्षभरात ही आघाडी अक्षरशः विखुरली.

मुंबई मनपा निवडणुकांत काँग्रेस-उद्धव ठाकरे युतीचा अभाव प्रकर्षाने जाणवला. उद्धव ठाकरे यांनी दुरावलेले चुलत बंधू राज ठाकरे आणि त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्याशी हातमिळवणी केल्यामुळे काँग्रेसने उद्धव यांच्यापासून अंतर ठेवले. मनसेचा स्थलांतरितांविरोधातील आणि अल्पसंख्याकांविषयी आक्रमक भूमिकेचा इतिहास लक्षात घेता, राज ठाकरे यांच्यासोबत राहिल्यास उत्तर भारतीय, मुस्लिम आणि इतर अल्पसंख्याक मतदार दूर जातील, अशी भीती काँग्रेसला वाटत होती आणि निकालांनी ती भीती खरी ठरवली.

मुंबईतील सुमारे १८ टक्के अल्पसंख्याक मते उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि समाजवादी पार्टी यांच्यात विभागली गेली. मनसेसोबत असताना नेमके कोणाला मत द्यायचे, याबाबत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. याचवेळी उत्तर भारतीय आणि तमिळ, तेलुगू अशा दक्षिण भारतीय भाषिक समुदायांनी एकत्र येत भाजपला पाठिंबा दिला. भाजपने हिंदुत्वाच्या

# श्री गुरु तेग बहादूर : धर्मरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान

**सिखांचे ९ वे गुरु हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहेब यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समागमानिमित्त राज्य शासनाच्यावतीने राज्यात विविध कार्यक्रम, उपक्रम घेतले जात आहे. त्याअंतर्गत दिनांक २४ जानेवारी रोजी नांदेड येथे भव्य कार्यक्रम होत आहे. त्यानिमित्त गुरुजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा लेखः**

## गुरुजींचा ३५० वा शहिदी शताब्दी समागम






श्री गुरु तेग बहादुर साहेब हे मानवतेचे रक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्य, समानता आणि मानवी मूल्यांसाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि छुआछूत यांसारख्या सामाजिक वाईट गोष्टींविरुद्ध आवाज उठवला. लोकांना शांतता, धैर्य आणि नि:स्वार्थ सेवेचा मार्ग दाखवला आणि आपल्या सर्वोच्च बलिदानाने धर्माचे रक्षण केले म्हणून त्यांना 'हिंद दी चादर' (भारताची चादर) असेही म्हटले जाते.

श्री गुरू तेग बहादूर साहिबजींचा शौर्याचा परिचय दिल्यानंतर गुरु हरगोविंद साहिब यांनी त्यांचे नाव बदलून तेग बहादूर ठेवले. रणांगणावरील त्यांच्या लढाई आणि तलवारीच्या कौशल्यातून त्यांना नाव मिळाले. रणांगणातील भीषण रक्तपाताचा गुरुजींच्या एकांतवासावर खोल परिणाम झाला. त्यांचे मन आध्यात्मिक चिंतनाकडे वळले. संयम, शांतता आणि त्यागाचे मुर्तिमंत श्री गुरु तेग बहादूर जी यांनी 'बाबा बकाला' नावाच्या ठिकाणी एकांतात २० वर्षे अखंड ध्यान केले. आठवे गुरु हरकिशन जी यांनी 'बाबा बकाले' यांना त्यांच्या उत्तराधिकारी नावाची सूचना दिली.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या मृत्युनंतर १६६४ मध्ये श्री गुरु तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून शिखांनी गादीवर विराजमान स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केले. एकदा गुरु तेग बहादुर आनंदपूर साहिबमध्ये एका संगतीत बसले होते. तेथेच काश्मिरी पंडितांचा एक गट त्यांच्या भेटीसाठी आला होता. पंडित किरपा राम या गटाचं नेतृत्व करत होते. हजारो [illegible] त्यांचा धर्म धोक्यात आलाय हे त्यांनी श्री गुरु तेगबहादूर जी यांना सांगितले. औरंगजेबाने नेमलेला काश्मीरचा गव्हर्नर इफ्तेखार खान याने सगळ्यांना इस्लामचा स्वीकार करण्याची सक्ती केलीय. जो कोणी इस्लाम स्वीकारणार नाही त्यांना मृत्युदंड देण्यात येईल, असाही आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी गुरुंनी विरोध केला. त्यानंतर औरंगजेबाच्या आदेशानुसार दिल्लीतील चांदनी चौक येथे त्यांना शहीद करण्यात आले. ज्या ठिकाणी त्यांना शहीदी करण्यात आले, त्या ठिकाणाचे नंतर गुरुद्वारा शीश गंज

छत्राखाली एकत्र या असा संदेश दिला आणि त्याचा त्यांना फायदा झाला. त्यामुळे ठाकरे बंधूंचे पुनर्मिलन फायदेशीर ठरण्याऐवजी उलट नुकसानकारक ठरले, हे स्पष्टझाले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांमध्ये पवार काकापुतण्यांच्या बाबतीतही असेच चित्र दिसले. गेल्या दोन वर्षांत दोन्ही राष्ट्रवादी गट परस्परांविरुद्ध लढत होते. अचानक एकत्र येणे आणि भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सभांत भाजपवर टीका करणे यामुळे कार्यकर्ते आणि मतदार गोंधळले. अनेकांनी भाजपकडे, तर काहींनी काँग्रेसकडे वाटचाल केली. राष्ट्रवादी (शरद पवार गट) पुणे शहराध्यक्ष व माजी महापौर प्रशांत जगताप यांनी रातोरात पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ते आपल्या मतदारसंघातून विजयी ठरले. यावरून पवार कुटुंबाच्या दुटप्पी धोरणाला पुण्यातील अनेक मतदारांनी नकार दिल्याचे दिसते.

या महापालिका निवडणुकांत अनेक घटक प्रभावी ठरले. पक्षांतरांची लाट, मतदानापूर्वीच्या शेवटच्या दिवसांत मोठ्या प्रमाणावर पैसे वाटपाचे आरोप, सरकारी योजनांची मोठ्या प्रमाणावर जाहिरात, तसेच विरोधकांवर माघार घेण्यासाठीचा दबाव. यामुळे निवडणुका होण्याआधीच ६६ उमेदवार बिनविरोध निवडून आले.

मात्र मुंबईत ज्यावर सर्वांचे लक्ष होते ते ठाकरे कुटुंबासाठी सर्वात निर्णायक ठरले ते त्यांचे अपयशी पुनर्मिलन. राज ठाकरे यांची साथ उद्धव ठाकरे यांना फायदेशीर ठरण्याऐवजी तोट्याची ठरली. तर पुणे जिल्ह्यात शरद पवारअजित पवार प्रकरणातही जवळपास हेच घडले, असा निष्कर्ष या निकालांतून पुढे येतो.

जन्म २१ एप्रिल १६२१ रोजी झाला झाला. गुरुजींचे जीवन त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी समर्पित होते. आजही लोक गुरु तेग बहादूर साहिब यांना शूर योद्धा म्हणून स्मरण करतात. श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या मानवता, शौर्य, मृत्यू, प्रतिष्टा या विचारांचाही गुरू ग्रंथसाहिबमध्ये समावेश करण्यात आला आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी आपल्या वडिलांसोबत मुघलांविरुद्ध लढा दिला. लहानपणापासूनच ते संतांसारखे, खोल विचारी, उदार मनाचे, शूर आणि निर्भय स्वभावाचे होते.

श्री गुरू तेग बहादूर जींचे पुर्वीचे नाव त्याग मल होते. त्यांच्या या केले. श्री गुरु तेगबहादूर सिंहजी धार्मिक प्रचारासाठी आपल्या अनुयायांसह विविध ठिकाणी यात्रा करत असत. पहिले शीख गुरू गुरू नानक जी यांच्यानंतरच्या दहा शीख गुरुंमध्ये सर्वाधिक प्रवास करणारे श्री गुरू तेग बहादूर साहीब होते. त्यांनी पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, आसाम, बांगलादेश असा प्रवास केला. गुरुजींच्या प्रवासाचे दस्तऐवजीकरण त्यांच्या भेटींच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापित केलेल्या गुरूद्वारांच्या स्वरूपात केले गेले आहे, त्यात अयोध्येतील एका गुरूद्वाराचाही समावेश आहे.

श्री गुरू तेग बहादूरजींनी धर्माच्या रक्षणासाठी आणि धार्मिक गुरुद्वारा साहिब आणि गुरुद्वारा रकाबगंज साहिब या शीख पवित्र स्थळांमध्ये रूपांतर करण्यात आले.

श्री गुरु तेग बहादुर जी हे फक्त शीख धर्माचे गुरू नव्हते तर ते मानवतेचे रक्षक आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक होते. त्यांचे जीवन आणि बलिदान आपल्याला आजही न्याय, समानता आणि स्वातंत्र्य यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देतात. विविध विषयांवर रचलेले श्री गुरु तेगबहादुरांची ११६ पद्ये उपलब्ध आहेत. श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनाचा इतिहास, त्याग, धर्माचे रक्षण, राष्ट्रप्रेम, आणि शिकवणींमधून आपण प्रेरणा घेऊया आणि मानवतेची सेवा करण्याचा संकल्प करुया.

**-गुरुमुख सिंह बावरा**
सहसचिव, विदर्भ क्षेत्रिय समिती
समुद्रपुर

## नगराध्यक्षा सौ.कविताताई सुनीलभाऊ ब्राह्मणकर यांचा सत्कार



***प्रतिनिधी/ पुलगाव :***


पुलगाव न.प. च्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. कविताताई सुनीलभाऊ ब्राह्मणकर यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय धनगर समाज संघ नाचणगाव-पुलगाव जिल्हा वर्धा तर्फे दि.२३.१२.२०२५ मंगळवार ला सायं. ०७.०० वा. त्यांचे निवासस्थानी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी सुधाकर गोरडे, दिलीप भुजाडे, विजय ढगे,सौ.निताताई ढगे,डॉ. रायपुरे, जुवारे सर, वसंत साव, प्रकाश साव, अमर तीनगसे, स्वप्नील गंधे,प्रशांत वाघमोडे, महेश मार्कंड, दर्शन दरगुडे, प्रवीण वाघमोडे, रामकृष्ण दरगुडे, नारायण वाघमोडे उपस्थित होते.

## श्रीसंत सावजी महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्याला प्रारंभ

### विविध धार्मिक उपक्रम; आज दिंडी पालखी सोहळा

***प्रतिनिधी/ वर्धा :***



श्री संत सावजी महाराज देवस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत सावजी महाराज यांच्या ३२ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन आर्वी नाका येथे शनिवार (दि. १७) पासून दोन दिवस करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या दैनंदिन कार्यक्रमात सकाळी श्रीचे मंगलस्नान, काकडा आरती, भजन, कीर्तन, भारूड, भाव भक्तीगीत भजन, हरिपाठ, प्रवचन, होमहवन, गोपालकाला, महाप्रसाद तसेच दिंडी-पालखी शोभायात्रा अशा विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आला आहे. समावेश करण्यात शनिवारी (दि. १७) गुरू माऊली विठ्ठल र खा ु माा इ ॅ चो मंगलस्नान, विधीवत अभिषेक विणा आरंभ, कलेशस्थापना, होमहवन कार्यक्रम डॉ. मनोहर जळगावकर यांच्याहस्ते झाले.

तर १० ते १२ वाजेदरम्यान हरी भक्त पारायण शोभा बानोस्कर यांचे प्रवचन, व १२ ते १.३० वाजेदरम्यान श्रीसंत सावजी महाराज यांचे नातू कृष्णा महाराज काकपूरे बुलडाणा यांचे कीर्तन, गुरूकृपा भजन मंडळ हनुमान गढ, वर्धा यांच्या सुमधुर खंजिरी भजनावलीचा कार्यक्रम झाला. ३ ते ५.३० वाजेदरम्यान गुरू माऊली पालखी सोहळा पार पडला. सायंकाळी ५.३० ते ७.३० वाजेदरम्यान हरिपाठ, भारूड, यशवंत डहाके, रूपराव खैरकार व संच भजनावलीचा कार्यक्रम पार पडला. रविवारी (दि. १८) दैनदिन विविध कार्यक्रमात श्रीचे पूजन व गोपालकाला व महाप्रसाद आयोजन केले आहेत. तर ७.३० ते ९.३० वाजेदरम्यान पाक्षाळपूजाचे भजन सादरीकरण गुरूदेव उपासक रूपराव खैरकार व साथसंगत संच कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभघेण्याचे आवाहन करण्यात आले.

# तरुणांना कृतिशील व समाजनिष्ठ करणारे व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना : नगराध्यक्ष किरणभाऊ ठाकरे



***प्रतिनिधी/ शिरपूर :***

महाराष्ट्र ही वीरपुरुषांची व संतांची भूमी असून या मातीत जन्मलेल्या थोर पुरुषांनी भारतमातेचा गौरव वाढविला आहे. प्रत्येक भारतीय थोर पुरुषाने स्वत:ला समाजहित व राष्ट्रहितासाठी वाहून घेतले आहे. त्यामुळे आजच्या तरुणांनी या थोर पुरुषांचा आदर्श घेऊन समाज व राष्ट्रासाठी विधायक कार्य करण्याची दृष्टी ठेवली पाहिजे आणि त्यासाठी अविरत कष्ट घेतले पाहिजेत, असे प्रतिपादन देवळी शहराचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष किरणभाऊ ठाकरे यांनी केले. स्थानिक जय विकास महाविद्यालय, शिरपूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भिडी येथे आयोजित निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राम विकास संस्था, शिरपूर-होरेचे अध्यक्ष जितेंद्र महल्ले होते.

किरणभाऊ ठाकरे पुढे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागात जाऊन शेतकरी व शेतमजूर यांच्या समस्या समजून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे. राष्ट्रीय सेवा योजना हे तरुणांना कृतिशील व समाजनिष्ठ करणारे प्रभावी व्यासपीठ असल्याने विद्यार्थी दशेत जास्तीत जास्त तरुणांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला मंचावर एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर ढाले, कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. विशाल दौलतकर, ग्रामीण रुग्णालय भिडी येथील डॉ. श्रीराम व डॉ. मेधावी, ज्युनियर कॉलेज शिरपूरच्या प्रा. मीनल महल्ले, ग्राम विकास संस्थेचे सचिव अथर्व महल्ले, पत्रकार राजूभाऊ वटाने, तसेच प्रा. निलेश गोंडे, प्रा. नरेंद्र डेबे, प्रा. आशिष ढगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या

प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजना गीत व विद्यापीठ गीत सादर केले. याच कार्यक्रमात देवळी शहराचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष किरणभाऊ ठाकरे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज ढोणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्वेता चौधरी व वर्षा वरफडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिलीप गुर्जर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच प्रा. डॉ. अमित दारुण्डे, प्रा. प्रतीक्षा नासरे, प्रा. प्रगती ठाकरे, प्रा. स्वाती राजूरकर, प्रा. सुजाता भांदकर, प्रा. गजानन लोखंडे, प्रा. गणेश धरत, प्रा. लांभे, आशिष बर्धिया, मिलिंद तागडे, सचिन खडसे, निखिल दिगडे, निलेश खडसे, सोनू वरफडे, सुशील होरे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# पत्रकार स्नेहमिलन व साहित्य गौरव पुरस्कार सोहळा २०२६



***देवळी सत्यदूत न्युज नेटवर्क***
***प्रतिनिधी/ मनवर शेख :***

हिंगणघाट तालुका पत्रकार संघ, हिंगणघाट यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ६ जानेवारी रोजी 'मराठी पत्रकार दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. या औचित्याने पत्रकार बांधवांचे स्नेहमिलन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला आहे.

यावर्षीचा मानाचा 'साहित्य गौरव पुरस्कार' प्रसिद्ध साहित्यिक व निवेदिका डॉ. मनीषा रिठे यांना प्रदान करण्यात आले. त्यांनी पत्रकार बंधवाचे आभार मानले.

या कार्यक्रमाला नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांनी आश्रय बेघर निवारा यांना आपण बेघर निवारा न देता दुसरं काही नाव देऊ असे सांगितले, की फळाचे व फुलाचे झाडे लावू नको तर सागवान बदाम या सारखे झाडे लावा त्या मुळे आपल्याला ऑक्सिजन मिळते. तर त्यांनी पत्रकार बांधवांसाठी एक जागा नेमून तिथे एक हॉल तायार करून देण्यात येईल असे सांगितले. त्याचं प्रमाणे नगरपरिषदचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

काही पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. हिंगणघाट पत्रकार संघाचे अध्यक्ष मंगेश मनिकर यांनी पत्रकार दिनाचे महत्त्व सांगितले तसेच सर्वांचे आभार मानले हिंगणघाट तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव व मान्यवरांची उपस्थिती होती.

# पहेलवानांनी आपल्या खेळाकडे लक्ष देवुन पुढे आपले लक्ष साध्य करावे

## महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा मा.खासदार रामदास तडस








***देवळी सत्यदूत न्युज नेटवर्क***
***रेणुका दुरबुडे/ देवळी***

आमच्या आठवणीत एक काळ असा होता जेव्हा खेडेगावातल्या जत्रेत खूप खेळ होत असत, यामध्ये कबड्डी, कुस्ती अन्य मातीतील खेळ खेळत होते, ग्रामीण खेळाला चांगल दिवस आणावयाचे असेल तर गावोगावी मातीचे खेळ व्हायला हवे, या शंकरपटात कुस्तीस्पर्धा आयोजीत करुन कुस्ती खेळाला एक व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याबद्दल आयोजकांचे आभार, आखाड्यांमध्ये वेगवेगळ्या खेळांचेही आयोजन करण्यात येत असे. पण काळ बदलला आणि या सर्व जुन्या पद्धती हळूहळू लयाला जाऊ लागल्या, आता परिस्थिती अशी झाली आहे की शाळांमध्ये होणारे पीटीचे तासही टाईमपास करायचे तास मानले जाऊ लागले. अशा विचारसरणीमुळे देशाने आपल्या तीन-चार पिढ्या गमावल्या. भारतात क्रीडा सुविधा वाढल्या नाहीत आणि नवीन क्रीडा पद्धतींनीही आकार घेतलेला नाही. आपल्या राज्यात खूप गुप्त आणि सुप्त क्षमता आहे, जी बाहेर येण्यास उत्सुक आहे. क्रीडा क्षेत्रातील ग्रामीण भागातील क्षमता ओळखुन केन्द्रसरकार व राज्यसरकारने क्रीडा नविन धोरण स्विकारल्यामुळे खेळाला चांगले दिवस येऊ लागले आहे, ग्रामीण खेळाचे महत्व वाढु लागले आहे, खेला इंडीया, राज्यस्तरीय स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा मध्ये शहरासोबत ग्रामीण भागातील खेळाडुंना संधी मिळत आहे, ग्रामीण भागातील खेळाडु सुध्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर जात आहे, खेळ कोणताही असो त्याचे असणारे फायदे असंख्य असतात. खेळ माणसाला विविध गोष्टी शिकवतो. त्यामुळेच खेळाचा उपयोग योग्य केल्यास त्याचा फायदा आपल्या सोबतच देशाला होतो, पहेलवानांनी आपल्या खेळाकडे लक्ष देवुन पुढे आपले लक्ष साध्य करावे असे यावेळी महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा मा.खासदार रामदास तडस म्हणाले

अल्लीपूर येथे अल्लीपूर शंकर पट व्यवस्थापन कमेटी व वर्धा जिल्हा कुस्तीगीर तालिम संघ व्दारा आयोजित महीला व पुरुष गट राज्यस्तरीय कुस्ती दंगल स्पर्धेचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा मा.खासदार रामदास तडस यांच्या शुभहस्ते व मा.खासदार सुरेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला, यावेळी वर्धा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मदनसिंग चावरे, माजी जि.प. अध्यक्ष नाना ढगे, माजी सदस्य अशोक सुपारे, वामनराव खोडे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समोयोचीत मार्गदर्शन केले.

महीला व पुरुष गट राज्यस्तरीय कुस्ती दंगल स्पर्धा ४०,४६,५२,५८,६३,७० व खुला वनज गटात असुन महाराष्ट्रातील पुणे, वर्धा, अमरावती,चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम,सोलापूर, चंद्रपूर, भंडारा येथील १५० पेक्षा जास्त महिला व पुरुष पहेलवान सहभागी झाले असुन त्यांना अल्लीपूर शंकर पट व्यवस्थापन कमेटीच्या विजेत्या पहेलवानांना वतीने रोख रक्कम व ट्राफी देण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शंकरपट व्यवस्थापन कमिटीचे श्रीराम साखरकर,गोपाल मेघरे,गोपाल गिरडे व वर्धा जिल्हा कुस्तीगीर तालिम संघच्या सर्व सदस्यानी प्रयत्न केले कार्यक्रमाला धनराज घुसे, उमेश बेलखेडे,विनोदभाऊ ठाकरे, प्रल्हाद. चांभारे, अरूण वरणे, मधुकर महाजन, प्रविण देशमुख, शंकर कामडी,रविंद्र वानी, चंदशेखर चांभारे, अशोक सुरकार, किरण ढगे, भुषण खंडरे, धिरज चांभारे, आकाश वादिले, निलेश तपासे, शंकर महाकाळकर, अमोल वरभे, प्रफुल गोते, डॉ.. मयुर अ.कातोरे, रोहित कलोडे, दिनेश सायंकार, श्रीमती. शोभा वाटखेडे, मंगेश कलोडे, गोपाल शिवणकर, शरव कारवटकर, रणदिप माधुरकर, निलेश पोंगडे, कैलास बाळबुधे, सो. स्मितालाई खोंड, कैलास नागरे, संदिप नरड व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

# महिलांना प्रेग्नंट करा आणि ५ लाख रुपये मिळवा

## ऑफर दिली अन् तुरुंगात रवानगी झाली



***वृत्तसंस्था/ पाटणा :***

मुलबाळ नसलेल्या महिलेला गर्भवती बनवा आणि लाखो रुपये कमवा, अशी जाहिरात सध्या बिहारच्या नवादा परिसरात व्हायरल होतेय. त्यामुळे अनेक लोकांनी या नंबरवर संपर्क साधला. जर महिलेला गर्भधारणा झाली तर त्या व्यक्तीला तब्बल ५ लाख रुपये दिले जातील. असे फोनवर सांगण्यात आले. मात्र, ते पैसे काही मिळालेच नाही. यानंतर लोकांच्या तक्रारीवरून ही खोटी जाहिरात पसरवणाऱ्या ३ सायबर गुन्हेगारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सायबर क्राईमचे जाळे देशातभरात पसरले आहे. आजपर्यंत लाखो लोक या फसवणुकीला बळी पडले आहेत. बिहारमध्येही अशीच एक घटना घडली गेल्या काही दिवसांपासन बिहारमध्ये मूल नसलेल्या महिलांना गर्भवती करण्यासाठी ५ लाख देण्याच्या जाहिराती येत होत्या. पैसे मिळवण्याच्या लालसेपोटी काही लोक हे काम करण्यास तयार झाले. लोकांनी जाहिरातदारांना संपर्क करून रजिस्ट्रेशन फॉर्म भरला. या फॉर्मसाठी त्यांनी पैसेही दिले. मात्र, पैसे भरल्यानंतर हे सायबर चोरटे संबंधित लोकांना ब्लॉक करायचे. या सायबर चोरट्यांनी अनेकांकडून अशा पद्धतीने पैसे घेतले होते.

# तळेगाव (दशासर) शंकरपटात महिला धूरकऱ्यानी गाजवले मैदान






***देवळी सत्यदूत न्युज नेटवर्क सुयोग ठाकरे/ धामणगांव (रेल्वे) :***

कृषक सुधार मंडळ द्वारा आयोजित १५ जानेवारी ला झालेल्या दो दाणी शंकर पट त्यानंतर १६ जानेवारी व १७ जानेवारी रोजी एकदानी पटाच्या आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर १८ जानेवारी रोजी महिला आरक्षित बैलजोडी स्पर्धेचे महिलासाठी मोठे आकर्षण असते. आता या महिला पटाने सुद्धा मोठे स्वरूप घेतले आज या पटाला पाहण्यासाठी दुरून मोठ्या संख्येने प्रेक्षक येतात तसेच महिला पटात भाग घेण्यासाठी विविध ठिकाणाहुन महिला येतात.दि.१८ जानेवारी रविवार रोजी महिला आरक्षित बैलजोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या महिला आरक्षित बैल जोडीचे स्पर्धेचे उदघाट्न अर्चनाताई देशमुख (चिटणीस) यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रमुख अतिथी पुष्पाताई देशमुख, शुभांगीताई देशमुख, मीनाक्षी ताई ठाकरे, अनिताताई मेश्राम, संध्याताई डेहनकर, निलीमा बनसोड, वर्षाताई सराफ, सुमनताई बेले,, सीमाताई कुळकर्णी संगीताताई गवळी, भारती ताई चुटे,नीताताई गवळी, मंजुषा देशमुख, माधुरी पांडे, सुप्रिया थोरात, प्रतिभा मरसकोल्हे, सुलोचना तिवाडे, सोनाली बेले, वैष्णवी डेहनकर, पायल कऱ्हाडकर, मोहिनी देशमुख, वनिता तोडसे इत्यादी उपस्थित होत्या.

उद्घाट्नाप्रसंगी धावलेल्या बैल जोडीचे पूजन करून महिला धुरकरि ला सन्मानित करण्यात आले व रितसर पटाला सुरवात करण्यात आली. पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी सुद्धा वेगवान जोड्या हाकल्या. या पटामध्ये महिला धुरकरी लक्ष्मी सोनबावणे यांनी हाकलेल्या सुंदर /राघव या बैल जोडीने १२.४३ सेकंद वेळात अंतर पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकाविला व श्रुती वाळके यांनी हाकलेल्या मल्हार / मोगली या बैल जोडीने १२.५२ वेळात अंतर पुर्ण करुन. द्वितीय क्रमांक पटकाविला. नीलम देशमुख यांनी साई /तेजा या बैल जोडी ला हाकून १२.५५ या वेळात अंतर पूर्ण करुन तृतीय क्रमांक पटकाविला व इतर बक्षिसाचे वितरण करण्यात आले. तसेच या महिला आरक्षित बैल जोडी स्पर्धेत महिला धुरकर्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. यावेळी मोठया संख्येने महिला उपस्थित होत्या.

# आमदार समीर कुणावार यांच्या जनसंपर्क कार्यालयात
# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी




***देवळी सत्यदूत न्युज नेटवर्क हर्षाली सातघरे/ हिंगणघाट :***

राजमाता जिजाऊ साहेब भोसले तसेच युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आमदार समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास आमदार समीर कुणावार यांच्यासह हिंगणघाट नगरपालिकेच्या अध्यक्षा डॉ. नयना उमेश तुळसकर, भाजपाचे ज्येष्ट नेते किशोर दिघे, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकुर, भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, हिंगणघाट नगर परिषदेचे गटनेते भूषण पिसे, डॉ. उमेश तुळसकर यांच्यासह हिंगणघाट शहरातील सर्व नवनियुक्त नगरसेवक व नगरसेविका तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. कुणावार यांनी आपल्या मनोगतातून राजमाता जिजाऊ यांच्या राष्ट्रघडणीतल्या योगदानावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे युवकांसाठी असलेले महत्व अधोरेखित केले.

त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रम शांततापूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# रोप फाउंडेशन च्या वतीने आनंदाची दिवाळी साजरी



***सचिन वैद्य/ देवळी :***

सण प्रत्येक माणसांच्या आयुष्यामध्ये नवचैतन्य हर्षउल्हास सुख समृद्धी आणि शांती घेऊन येतो. हाच विचार मनामध्ये ठेवून रोप फाउंडेशन वर्धा जिल्हा आणि स्वर्गीय नानाजी कामनापुरे जलकल्याण संस्था यांच्या वतीने आनंदाची दिवाळी हा कार्यक्रम श्री छाया बालगृह वर्धा येथे साजरा करण्यात आला आनंदाची दिवाळी हा कार्यक्रम म्हणजे फराळ देऊन प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सोबत काहीतरी गप्पा गोष्टी गाणी शिक्षणासोबत इतर काही गोष्टी यांची देखील देवाण-घेवाण या कार्यक्रमांमध्ये करण्यात आली प्रत्येक बालगृहातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात हिरगिरीने सहभाग घेतला त्याचबरोबर येथील कर्मचाऱ्यांनी सुद्धा याला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन फाउंडेशनच्या प्रत्येक कार्याला सहकार्य दिलं आणि हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

त्याचबरोबर तेथे विद्यार्थ्यांना फराळ वाटप देखील करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी रोप फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष कौस्तुभ ओम पाचडे रोकडे, सर्वजित कंगाले, उमेश भागवत, देवांशू धोटे, ओम बाजारे, ओम खेडकर, होमराज रवंदळे, मनीष पुरवटकर रोहित वसू वेदांत कोंबे, रोशन लोहकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अखिल भारतीय मराठा महासंघाकडून यांची ४२८ वी जयंती 'दीपोत्सव आणि जयघोष'करून साजरी



***सचिन वैद्य/ दवळी :***

अखिल भारतीय मराठा महासंघाकडून दरवर्षी क्रांतीज्योती सावित्रीमाई ते स्वराज्यप्रेरीका माँ साहेब जिजाऊ यांचा नवरात्रोत्सव हा दीपोत्सव आणि जयघोषाने साजरा केला जातो. यावर्षी सुद्धा राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले तसेच त्यांच्या महिला सहकारी शिक्षिका फातिमा शेख आणि युवकांचे प्रणेते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन आणि माल्यार्पण नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, जिल्हाध्यक्ष अरुण जगताप,महिला जिल्हाध्यक्षा मनीषा निकम,लीनेस जिल्हाध्यक्षा धनश्री भांडेकर यांचेकडून करण्यात आले.या नंतर डॉ विजय बाबर आणि उपस्थित पदाधिकाऱ्यांकडून जिजाऊ वंदनेचे गायन करण्यात आले.

या प्रसंगी सुधीर पांगुळ यांनी माँ साहेब जिजाऊ यांनी स्वराज्याचे दोन छत्रपती घडविले,जिजाऊ चरणी नतमस्तक होतांना आपल्याला ऊर्जा प्राप्त होते,या महापुरुषांकडून आपल्याला समतेचा दृष्टीकोन प्राप्त होतो असे प्रतिपादन केले. विदर्भ सचिव दीपक कदम यांनी आपले विचार व्यक्त करतांना माँ जिजाऊ या जनामनात चैतन्य निर्माण करणाऱ्या आहेत. या महानायिकांची आणि युगपुरुषाची जयंती ही आपल्याला प्रेरणा देणारी असल्याकारणाने आपण त्यांच्यापुढे नतमस्तक होणे गरजेचे आहे असे सांगितले. सरतेशेवटी माँ जिजाऊ, छत्रपती शिवराय आणि शंभूराजे यांचा जयघोष करून डॉ विजय बाबर यांनी गारद सादर केली.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विभागीय उपाध्यक्षा रोहिणी बाबर यांनी केले. लीनेस क्लब, प्रांताध्यक्षा प्रतिभा वाळके,कोषाध्यक्षा नीलिमा गोटे यांचे कार्यक्रमात विशेष सहकार्य लाभले.याप्रसंगी स्मारक स्थळी साफसफाई आणि रांगोळी काढण्याचे महत्वपूर्ण काम जिल्हा सचिव माधुरी मोहिते आणि युवती अध्यक्षा मोनाली मोहिते यांनी केले.

कार्यक्रमाला मराठा महासंघ कार्याध्यक्ष अभिजीत जांभुळकर, शहराध्यक्ष विवेक जगताप, जिल्हापदाधिकारी अमोल वाघ, बबनराव चव्हाण, शिवाजी निकम, विजय गोडसे, सुनील निकम, सुभाष कदम,सुधीर काहळे, अभिजित देशमुख, महिला पदाधिकारी नीता उबाळे, विजयश्री साळुंके, रागिणी गिरमकर,उषा निकम,जयश्री कदम, नीलिमा सुधीर पांगुळ, भावना सोमवंशी, पुष्पा सोमवंशी, ज्योती देवतारे, नलिनी धानोरकर, राखी दामले,आश्विनी काकडे, माया वावरे, रीमा चौधरी, भाग्यश्री गांडोळे यांच्यासह बहुसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

**हे साप्ताहिक पत्र प्रकाशक, मालक,संपादक सचिन जगनराव वैद्य यांनी मुद्रक निरंजन नारायणराव मेंढे, कुशलमित्र प्रिंटर्स अँड जॉब सेंटर, हनुमान नगर, वार्ड नंबर २९, वर्धा येथे मुद्रित करून नव स्वराज्य न्युज व देवळी 'सत्यदूत कार्यालय' वॉर्ड नंबर १४ येंडीलपुरा. देवळी. जिल्हा वर्धा -४४२१०१ देवळी येथे प्रकाशित केले.**
**संपर्क : ७७९८७७५६३८, ७५५८७७५६३८ ई. मेल : devalisatyadoot@gmail.com वेबसाईट : www.devalisatyadoot.com सोशल व्यासपीठ : फेसबुक, इंस्टाग्राम, youtube वर आपण बघू शकता.**
(या वृत्तपत्रातील लेख, जाहिरात, बातमी, मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही सर्व वाद वर्धा न्यायालय अंतर्गत)

This weekly newspaper is printed by the publisher, owner, editor Sachin Jaganrao Vaidya, printer Niranjan Narayanrao Mendhe at Kushalmitra Printers and Job Center Hanuman Nagar, Ward No. 29, Wardha and distributed by Nav Swarajya News and **`Deoli Satyadoot' Office :** Ward No. 14. Yendilpura. Deoli. District Wardha- 442101.Published at Deoli.
**Contact:** 7798775638, 7558775638 Email: devalisatyadoot@gmail.com Website: www.devalisatyadoot.com Social platform : You can watch on Facebook, Instagram, YouTube.
(The editor does not necessarily agree with the articles, advertisements, news, or content in this newspaper. All disputes are subject to the Wardha Court.)